गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष २ रे ● अंक १८ वा ● मंगळवार ०४ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 18 | Date : 04/06/2024 blow Tuesday Page 4 Price 4

# लोकसभा निवडणुकीत देशाचा कौल कोणाला..

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. या निकालाकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे. या निकालाच्या आधी एक्झिट पोल्सचे आकडे समोर आले होते. त्यामध्ये एनडीएला बहुमत मिळेल, असा अंदाज वर्तवण्यात आला. एनडीएला ३५० पेक्षा जास्त जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. तसेच इंडिया आघाडीला १५० ते १७० जागा मिळतील, असं एक्झिट पोलमध्ये सांगण्यात आलं. असं असलं तरी एनडीए की इंडिया आघाडी कोण सत्ता स्थापन करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेलं आहे.

भारतीय जनता पार्टीने लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान ४०० पारचा नारा दिला होता. संपूर्ण प्रचारात भाजपाच्या नेत्यांनी ४०० पारच्या नाऱ्यावर नेत्यांनी भर दिला. मात्र, निकालाच्या आधी एक्झिट पोल्सचे आकडे समोर आल्यानंतर एनडीए ४०० पार करणार नाही तर ३७५ पर्यंत जाईल असा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. त्यामुळे भाजपाचं ४०० पारचं स्वप्न भंगणार असं चित्र दिसत आहे. पण असं असलं तरी एनडीए बहुमतात



सत्ता स्थापन करेल, असा अंदाजही व्यक्त करण्यात आलेला आहे.

दुसरीकडे इंडिया आघाडीला एक्झिट पोल्सलच्या अंदाजानुसार १५० ते १७० पर्यंत जागा निवडून येतील, असं म्हटलं आहे. मात्र, इंडिया आघाडीने एक्झिट पोल्सलची आकडेवारी फेटाळून लावत इंडिया आघाडी देशात २९५ जागा निवडून येतील, असा दावा केला आहे. त्यामुळे देशाचा कौल एनडीए की इंडिया आघाडीला आहे, याचा निकाल लागण्यासाठी अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. ४ जून रोजी सकाळी ८ वाजेपासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. त्यानंतर नरेंद्र मोदी पुन्हा हॅट्ट्रीक करणार की इंडिया आघाडीला यश मिळणार? याचा निर्णय आता अवघ्या काही तासांत समजणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या अवघे काही तास आधी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीसाठी भाजपाचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दाखल झाले आहेत. त्यामुळे निकालाआधी घडामोडींना वेग आला असून देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांच्यात काय चर्चा झाली,

यासंदर्भातील तपशील अद्याप समोर आलेला नाही. मात्र, विधानपरिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघातील उमेदवारीसंदर्भात चर्चा होण्याची शक्यता आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघामधून मनसेने अभिजीत पानसे यांना उमेदवारी दिली आहे. तर भारतीय जनता पार्टीने निरंजन डावखरे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे कोकण पदवीधर निवडणुकीसंदर्भात देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांच्यात चर्चा झाल्याचा अंदाज आहे.

# कंटेनरला धडकून कारमधील पिता-पुत्र ठार

**सोलापूर/प्रतिनिधी:**

हैदराबाद रस्त्यावर बोरामणीजवळील चिरका तांडा येथे समोरून जाणाऱ्या कंटेनरला पाठीमागून कार धडकल्याने पिता-पुत्राचा मृत्यू झाला तर दोघेजण जखमी झाले आहेत. हा अपघात सोमवारी सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास घडला. वीरेंद्र संजय कारंजे (वय २७) व संजय शांतप्पा कारंजे (वय ५५, दोघे रा. नातेपुते, ता. माळशिरस) अशी मरण पावलेल्यांची नावे आहेत. तर वैभव संजय कारंजे (वय २४, रा. नातेपुते) व सुमन लक्ष्मण लिगाडे (वय ६०, रा. बाळे, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. यातील मृत व जखमी हे होंडा सिटी कार (एमएच १२ सीडी २४८१) मधून हैदराबाद रस्त्यावरून सोलापूरच्या दिशेने येत होते. बोरामणीजवळील चिरका तांडा येथे समोर जाणाऱ्या कंटेनर (टीएस ०८ यूजे ५४२८)ला पाठीमागून येणारी कार वेगाने धडकली. यामध्ये कार समोर असलेल्या कंटेनरच्या खाली गेली. त्यामध्ये गंभीर जखमी होऊन दोघांचा जागीच मृत्यू झाला तर कारंजे व लिगाडे हे जखमी झाले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर तालुका पोलीस



ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. अपघातातील मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवले तर जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

जखमींवर शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची प्राथमिक नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे. याबाबत रोहित राजेंद्र कनोजिया (वय २४, जोनपूर खुर्द, उत्तर प्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक इज्जपवार हे करीत आहेत.

## माजी कुलगुरूंच्या कारची दुचाकींना धडक; ३ जणांचा मृत्यू

**कोल्हापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

येथील सायबर चौकात शिवाजी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू यांच्या भरधाव कारने दुचाकींना धडक दिल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात तीनजणांचा मृत्यू झाला. या अपघातात तीनजणांनी जागीच जीव गमावला असून चार ते पाचजण गंभीर जखमी असल्याची माहिती देण्यातआली. अपघातात गंभीर जखमी झालेल्यांपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहितीही समोर आली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, ज्या वाहनाने दुचाकींना धडक दिली ती कार शिवाजी विद्यापीठाच्या माजी कुलगुरूंची आहे. विशेष बाब म्हणजे, या अपघातात शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू वसंत चव्हाण यांचाही मृत्यू झाला आहे. गाडी चालवताना चव्हाण यांना चक्कर आली आणि त्याचवेळी त्यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले.

कोल्हापूरच्या अपघातात शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण यांचा अपघाती मृत्यू झाल्याने शैक्षणिक क्षेत्राला धक्का बसला. प्रभारी कुलगुरू व प्र - कुलगुरू पदावर त्यांनी काम केले होते. ते दीड वर्ष प्राचार्य होते. भारती विद्यापीठामध्ये संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते.

# पुलवामात दोन दहशतवादी ठार; सुरक्षा दलांची संयुक्त कारवाई

**श्रीनगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

दक्षिण काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात सोमवारी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले अशी माहिती जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी दिली. पुलवामामधील निहामा भागात दहशतवादी



लपले असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी तिथे घेराबंदी करून शोधमोहीम राबवली असे पोलिसांनी सांगितले.

दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या जवानांवर गोळीबार केल्यानंतर त्यांनी त्याला प्रत्युत्तर दिले. या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले, असे काश्मीरचे पोलीस महानिरीक्षक व्ही के बिरधी यांनी सांगितले. मृत दहशतवाद्यांची ओळख आणि ते कोणत्या गटासाठी कार्यरत होते याचा तपास लावला जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

पोलिसांनी दहशतवाद्यांबद्दल अधिक काही सांगितले नसले तरी, लष्कर-ए-तय्यबाचे (एलईटी) दोन दशतवादी सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाबरोबर चकमक करत असल्याची माहिती सूत्रांनी आधी दिली होती. यापैकी एक दहशतवादी दीर्घकाळापासून सुरक्षा दलाच्या रडारवर होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रियाझ अहमद दार आणि रईस अहमद अशी त्यांची नावे असून दोघेही पुलवामाच्या काकापोरा गावचे रहिवासी आहेत. यापैकी दार सप्टेंबर २०१५पासून एलईटीबरोबर कार्यरत असून अनेक वेळा सुरक्षा दलांच्या तावडीतून निसटला आहे. तर अहमद २०२१पासून एलईटीबरोबर आहे. एक्स'वरून पोलिसांनी माहिती दिली की, दहशतवादविरोधी मोहिमेत ठार झालेल्या दोन दहशतवाद्यांचे मृतदेह मिळाले आहेत. त्यांचा परिचय आणि दहशतवादी गट यांची खात्री केली जात आहे.

# मनोज जरांगे यांचं उद्याचं उपोषण स्थगित; उपोषणासाठी आता नव्या तारखेची घोषणा

**मुंबई/दैनिक यशसिध्दी न्यूज**

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. आता हा निकाल समोर यायला अवघे काही तास बाकी आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे. अशातच मराठा समाजाच्या ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी



काही दिवसांपूर्वी ४ जून रोजी उपोषणाला बसण्याची घोषणा केली होती. मात्र, आता मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या उपोषणाची तारीख बदलली आहे. निवडणुकीचा निकाल पाहता आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न पाहता हा निर्णय घेतला असल्याची माहिती सांगण्यात आली आहे.

लोकसभा निवडणुकीचा निकालाकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलेलं असताना मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी ४ जून रोजी पुन्हा एकदा उपोषणाला बसणार असल्याची घोषणा काही दिवसांपूर्वी केली होती. पण मनोज जरांगे पाटील यांच्या गावामधून म्हणजे अंतरवाली सराटी येथील काही ग्रामस्थांनी उपोषण आंदोलनाला विरोध करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. या आंदोलनामुळे गावातील जातीय सलोखा बिघडत असल्याचं त्यांनी म्हटलं. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण तात्पुरत स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.


मनोज जरांगे पाटील यांनी ४ जून रोजीचं । **पान २ वर**

# निवडणूक आयोगाविरोधात कारस्थानाचा पॅटर्न

## मुख्य केंद्रीय आयुक्त राजीव कुमार यांचा गंभीर आरोप

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

'इंडिया' आघाडीच्या नेत्यांनी मतमोजणीच्या प्रक्रियेसंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेतल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी, सोमवारी केंद्रीय मुख्य आयुक्त राजीवकुमार यांनी पत्रकार परिषद घेऊन 'मतमोजणीमध्ये कोणताही गैरप्रकार वा अनियमितता होणार नाही', अशी ग्वाही दिली. तसेच केंद्रीय आयोगाच्या कार्यक्षमतेवर शंका घेण्याचा 'पॅटर्न' असून




जाणीवपूर्वक जनतेची दिशाभूल करण्याचे कारस्थान असल्याचा गंभीर आरोपही केला. लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचे सातही टप्पे पूर्ण झाले असून मंगळवारी देशभरातील ५४१ मतदारसंघांमध्ये मतमोजणी होणार आहे. मतमोजणीपूर्वी कधीही केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरण देण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित केली गेली नव्हती. मात्र, शनिवारी 'इंडिया'च्या घटक पक्षांच्या नेत्यांची महत्त्वाची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये मतमोजणीच्या प्रक्रियेमध्ये गैरप्रकार होऊ नये, याची दक्षता घेण्याचा निर्णय झाला. यासंदर्भात 'इंडिया'च्या नेत्यांनी रविवारी केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेऊन मतमोजणीबाबत शंका घेणारे मुद्दे उपस्थित केले. त्यानंतर आयोगाने पत्रकार परिषद घेतल्याने आश्र्चर्य व्यक्त केले जात आहे.

देशातील निवडणुका निष्पक्ष होत नसल्याचा आरोप केंद्रीय निवडणूक आयोगावर करण्यामागे निश्र्चित स्वरूपाचे कारस्थान आहे. मी या कारस्थानाला 'टूलकीट' असे म्हणणार नाही. मात्र, आयोगावर अविश्र्वास दाखवणे, शंका घेणे हा नियोजित कटाचा भाग असू शकतो, असा दावा राजीव कुमार यांनी केला. मतदानपद्धतीवर शंका घेतली गेली, त्यानंतर निवडणूक यंत्रांबाबत साशंकता व्यक्त केली गेली. मतदानाच्या चार दिवसाआधी सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणी झाली. त्यामुळे निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करण्याचा एक 'पॅटर्न' दिसतो, असे निरीक्षण आयुक्तांनी नोंदवले. या विरोधात अधिक क्षमतेने लढावे लागेल, असे राजीव कुमार म्हणाले.

टपालाद्वारे झालेल्या मतांची मोजणी मतदान यंत्रांच्या मतमोजणीआधी पूर्ण झाली पाहिजे, अशी मागणी 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांनी आयोगाला केली आहे. नियमाप्रमाणे मतदान यंत्रांतील मतांच्या मोजणीआधी ३० मिनिटे टपालमतांची मोजणी सुरू होत असली तरी, ती मतदान यंत्रांतील मतमोजणी झाली तरी सुरू राहते. त्याआधी निकाल जाहीर होण्याचा धोका असतो. त्यामुळे टपालमतांची मोजणी पूर्ण झाल्यावर मतदानयंत्रांतील मतांची मोजणी करावी अशी सूचना 'इंडिया' आघाडीने केली आहे. मात्र, त्यावर मुख्य आयुक्त। **पान २ वर**

# लोकसभेच्या निमित्ताने देशात घडला विश्वविक्रम, 'इतक्या' कोटी मतदारांनी केलं मतदान

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या सात टप्प्यांत तब्बल ६२.३६ टक्के मतदान झालं आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने देशात विश्र्वविक्रम घडला आहे. कारण, या सात टप्प्यांत ६४ कोटी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली. निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा देशात ६४ कोटी २ लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. ऋ७ मधील एकूण देशातील दीडपट अधिक तर, युरोपिअन युनिअनमधील २७ देशाच्या तुलनेत अडीचपट अधिक हे मतदान आहे. यंदा महिला मतदारांच्या संख्येतही वाढ झाली आहे. यामध्ये तब्बल ३१ कोटी १४ लाख महिला मतदार आहेत.

सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा



करताना आयुक्त राजीव कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशात ९६.६ कोटी मतदार आहेत. यामध्ये ४९.७ कोटी पुरुष मतदार आणि ४७.१ कोटी महिला मतदार आहेत. यापैकी एकूण ६४ कोटी २ लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. म्हणजेच, यंदा देशात ६२. ३६ टक्के मतदान झालं आहे. यंदा मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याने निवडणूक आगोयाच्या आयुक्तांनी उभं राहून दाद दिली. जम्मू आणि काश्मीरमध्येही मोठ्या प्रमाणात मतदान झालं आहे. । **पान २ वर**

## संपादकीय

### अल्पसंख्याकांबद्दल वक्तव्य ..

देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी पंजाबच्या नागरिकांसाठी लिहिलेले एक पत्र समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहे. मी या निवडणुकीतील राजकीय चर्चा अतिशय काळजीपूर्वक ऐकली. निवडणूक प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अतिशय द्वेषपूर्ण भाषणे केली आहेत, जी पूर्णपणे समाजासमाजात फूट पाडणारी आहेत. नरेंद्र मोदी पहिले पंतप्रधान आहेत, ज्यांच्यामुळे पंतप्रधानपदाची प्रतिष्ठा आणि गांभीर्य कमी झाले. याआधी कोणत्याही पंतप्रधानाने माझ्याविरुध्द अशी घृणास्पद, असंसदीय आणि खालची भाषा वापरली नाही, असे डॉ. मनमोहन सिंग यांनी या पत्रात म्हटले आहे. मोदी यांनी राजस्थानमधील बांसवाडा येथे निवडणूक रॅलीत डॉ. मनमोहन सिंग यांच्या २००६ च्या भाषणाचा संदर्भ देत काँग्रेसला लक्ष्य केले होते. याआधी काँग्रेसचे सरकार सत्तेवर असताना डॉ. सिंग म्हणाले होते की, 'देशाच्या मालमत्तेवर मुस्लिमांचा पहिला हक्क आहे.' म्हणजे ही संपत्ती गोळा केल्यानंतर ते ती ज्यांना जास्त मुले असतील त्यांना ती  ाटून देतील, इतकेच नव्हे तर घुसखोरांनाही ती वाटतील. तुमच्या कष्टाचे पैसे घुसखोरांना देणार का? तुम्हाला हे मान्य आहे का, असा प्रश्न मोदींनी नागरिकांना विचारला. पण वास्तवात डॉ. मनमोहन सिंग यांनी हे वक्तव्य वेगळ्या संदर्भात केले होते. अकराव्या पंचवार्षिक योजना आणि विकासावर चर्चा करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान डॉ. सिंग यांनी राष्ट्रीय विकास परिषदेच्या ५२ व्या बैठकीला संबोधित केले होते. अनुसूचित जाती-जमातींचेपुनरुज्जीवन करण्याची गरज आहे. नवनवीन योजना आणून अल्पसंख्याक, विशेषत: मुस्लीम बांधवांची उन्नती होईल आणि त्यांना विकासाचे फायदे मिळतील याची काळजी घ्यावी लागेल. या सर्वांचा संसाधनांवर पहिला हक्क असावा, असे मत त्यांनी त्यावेळी मांडले होते. त्यातच काँग्रेस नेते सॅम पित्रोदा यांच्या अमेरिकेतील वारसा कराबद्दलच्या वक्तव्याची भर पडली. जर एखाद्याची संपत्ती शंभर दशलक्ष डॉलर असेल आणि त्याचा मृत्यू झाला तर फक्त ४५ टक्के रक्कम त्याच्या मुलांच्या नावे राहील, बाकीची सरकारकडे जाईल, असा हा कायदा आहे. मात्र, मोदी यांनी पित्रोदा आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या याच मुद्द्याचे भांडवल केले. काँग्रेसची सत्ता आली तर तुमच्या गळ्यातील मंगळसूत्रही काढून दुसऱ्या समाजाला देतील, अशा आशयाचे विधान करून मोदी यांनी थेट हिंदू महिलांच्या दृष्टीने हा मुद्दा भावनिक केला. मात्र, मोदी यांनी आपल्या प्रचाराच्या भाषणांमध्ये अल्पसंख्याकांबद्दल वक्तव्य करणे सुरूच ठेवले.

# भिवंडी लोकसभा मतदारसंघात मतमोजणीची रंगीत तालीम

**ठाणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी लोकसभा मतदार संघातील मतमोजणी के.यू. डी. कंपाउंड, कल्याण सापे पडघा रोड, सावद गाव, पो. आमणे, ता.भिवंडी येथे होणार असून मतमोजणीसाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे. सकाळी ८.०० वाजल्यापासून मतमोजणीस प्रारंभ होणार असून आज मतमोजणी केंद्रात केंद्रीय निवडणूक निरीक्षक राजनवीर सिंग कपूर, राजेशकुमार साह व निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांच्या उपस्थितीत रंगीत तालीम पार पडली.

२३ भिवंडी लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघापैकी पाच विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी १४ टेबल तर मुरबाड विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी २१ टेबल लावण्यात आले आहेत. तर टपाली मतदान मतपत्रिका मोजणीसाठी स्वतंत्र १४ टेबल लावण्यात आले आहेत. टपाली मतपत्रिकेची मतमोजणी ही सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नंदकुमार कोष्टी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यांच्याअधिपत्याखाली त्यांच्या अधिपत्याखाली टपाली मतपत्रिकेचे मोजणी होणार आहे.

१३४ भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघासाठी २५ फेऱ्या, १३५ शहापूर विधानसभा मतदारसंघासाठी २४ फेऱ्या, १३६ भिवंडी पश्र्चिम विधानसभा मतदारसंघासाठी २२ फेऱ्या, १३७ भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघासाठी २३ फेऱ्या, १३८ कल्याण पश्र्चिम विधानसभा मतदारसंघासाठी २९ फेऱ्या, आणि १३९ मुरबाड विधानसभा मतदारसंघासाठी २५ फेऱ्या होणार आहेत.प्रत्येक मतमोजणी टेबलवर एक निरीक्षक, एक मतमोजणी सहाय्यक आणि एक शिपाई, केंद्रीय सूक्ष्म निरीक्षक यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत, केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे दोन निरीक्षकांची नियुक्ती या मतमोजणीसाठी करण्यात आलेली आहे.. मतमोजणीकरिता निवडणूक निर्णय अधिकारी, तसेच सर्व सहाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिपत्याखालील सर्व कर्मचारी असे एकूण ५५० अधिकारी व कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्यात आली आहे. तर ५०० हून अधिक पोलीस कर्मचारी यांच्या बंदोबस्तात मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. तसेच पासधारक माध्यम प्रतिनिधींसाठी स्वतंत्र माध्यम कक्षाची व्यवस्था करण्यात आली आहे.

आज झालेल्या रंगीत तालीम दरम्यान मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी यांना मतमोजणी प्रक्रियेची सर्व माहिती देण्यात आली. तसेच मतमोजणी केंद्रावर करण्यात आलेली तयारी, सोयीसुविधा याचा आढावा निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी घेतला.

# नांदेड जिल्हा प्रशासनाची मतमोजणीसाठी जय्यत तयारी

**नांदेड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नांदेड मतदार संघातील २३ उमेदवारांपैकी अठराव्या लोकसभेमध्ये खासदार म्हणून कोण जाणार याचा निवाडा उद्या मतमोजणी प्रक्रियेद्वारे होणार आहे. नांदेड जिल्हा प्रशासनाने मतमोजणी प्रक्रियेची जय्यत तयारी केली असून आज दोन्ही निवडणूक निरीक्षक तसेच जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत कर्मचाऱ्यांची रंगीत तालीम घेण्यात आली. उद्या सकाळी साडेदहा ते अकराच्या सुमारास पहिल्या फेरीचा निकाल कळेल तर सायंकाळी उशिरापर्यंत अंतिम निकाल येईल अशी शक्यता आहे.

नांदेड लोकसभा मतदार संघातील सहाही विधानसभा मतदार संघासाठी २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान पार पडले. नांदेड जिल्हयात एकूण १८ लाख ५१ हजार ८४३ मतदार होते. यात ९ लाख ५५ हजार ८४ पुरुष तर ८ लाख ९६ हजार ६१७ महिला तर १४२ तृतीयपंथीयाचा समावेश होता. जिल्हयामध्ये ६०.९४ टक्के मतदान झाले एकूण ११ लक्ष २८ हजार ५६४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. आज निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र्न, समीरकुमार ओ. जे. यांच्यासह जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, निवडणूक निरीक्षकासह विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

**८० दिवसांचा निवडणूक कार्यक्रम** १६ मार्च पासून उदया ४ जून असे एकूण ८० दिवस प्रशासन निवडणूक प्रक्रीयेत व्यस्त होते. नांदेड जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यात आली. नांदेड दक्षिण मतदार संघातील विष्णुपुरी येथे पर्यावरणपूरक मतदान केंद्र स्थापन केले होते. विविध मान्यवरांनी या केंद्राला भेटी दिल्या. महिला सखी मतदान केंद्र, वजीराबाद नांदेड येथे गुलाबपुष्प देऊन मतदारांचे स्वागत करण्यात आले होते. तसेच प्रशासनाने केलेली तयारी आणि आवाहनाला प्रतिसाद देत मतदारांनी २६ एप्रिल २०२४ रोजी मतदानाला भरभरुन प्रतिसाद दिला. यात महिला, पुरुष, नवमतदार, दिव्यांग, तृतीयपंथ यांनी मतदानाचा हक्क बजावला. नांदेडमध्ये ६०.९४ टक्के मतदान झाले.

**आज स्ट्राँग रूम उघडणार** मतदानाच्या मतपेट्या तीन स्तरीय सुरक्षा व्यवस्थेत शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात स्ट्राँगरूममध्ये २५ एप्रिलपासून ठेवण्यात आल्या आहेत. निवडणूक निरीक्षक, जिल्हाधिकारी, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्राँग रूम सिलबंद करण्यात आले आहे. यांची २४ तास इनकॅमेरा निगराणी ठेवण्यात आली होती. उदया सकाळी ७ वाजता स्ट्राँग रूम निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निरीक्षक व प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येणार आहे.

**२३ उमदवाराचे भवितव्य आज ठरणार** लोकसभेसाठी विविध पक्ष व अपक्ष म्हणून लढलेल्या २३ उमेदवारांचे भवितव्य उद्या ठरणार आहे.

**तळ व पहिल्या माळ्यावर प्रत्येकी ३ केंद्र**तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या तळमजल्यावर भोकर नांदेड उत्तर व नांदेड दक्षिण या मतदारसंघाची मतमोजणी होणार आहे तर पहिल्या मजल्यावर नायगाव,देगलूर व मुखेड विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी होणार आहे. पहिल्या माळ्यावरच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय थाटण्यात आले असून या ठिकाणावरून सहा विधानसभा मतदारसंघातील मतमोजणीचा एकत्रित फेरी निहाय निकाल निवडणूक आयोगाला तसेच जनतेला कळविण्यात येणार आहे.

**अतिरिक्त मंडप व पायाभूत सुविधा** याठिकाणी सर्व पायाभूत सुविधा पूर्णतः कार्यरत झाल्या आहेत. मतमोजणी करताना आवश्यक असणारा राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचा सहभाग, माध्यमांचा सहभाग, निवडणूक निरीक्षक आणि भारत निवडणूक आयोगाला तातडीने देण्यात येणारी माहिती, यासाठी आवश्यक पूरक तांत्रिक व भौतिक यंत्रणा या परिसरात तयार करण्यात आल्या आहेत. मतमोजणी कक्षामध्ये आवश्यक ती बैठक व्यवस्था तसेच कर्मचारी व मतमोजणी एजंट यांच्यासाठी उभी राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे या ठिकाणी पिण्याचे पाणी तसेच खानपानाची व्यवस्था देखील प्रशासनाने केली आहे.

**स्ट्राँग रूम परिसरात बंदोबस्त**शासकीय तंत्रनिकेतन, बाबानगर, नांदेड येथे असणाऱ्या स्ट्राँग रूमसाठी तीनस्तरीय सुरक्षा यंत्रणा तैनात असून प्रवेशिका व तपासणी प्रक्रियेशिवाय या ठिकाणी कोणालाही प्रवेश नाही. दर्शनी भागात सहा स्ट्राँग रूम मधील सीसीटीव्ही कॅमेरे २४ तास सुरू असून मतदान झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासून या ठिकाणी सील लावण्यात आले आहे. स्ट्राँग रूममध्ये कोणालाही प्रवेश नसतो. २४ तास कॅमेऱ्याच्या माध्यमातून निगराणी केली जात आहे. उद्या सकाळी सात वाजता स्ट्राँग रूम उघडण्यात येणार आहे.जवळपास ५०० कर्मचारी आतमध्ये या सर्व प्रक्रियेमध्ये सहभागी आहेत.. तेवढेच पोलीस अधिकारी - कर्मचारी सुरक्षा यंत्रणे संदर्भात काम करणार आहे.

**सकाळी ८ वाजता मतमोजणीला प्रारंभ** सकाळी आठ वाजता मतमोजणीला प्रारंभ होईल. प्रथम पोस्टल बॅलेट पेपर व या वर्षी घरी जाऊन घेण्यात आलेल्या ज्येष्ठांच्या मतदानाची मोजणी होणार आहे. त्यानंतर एकाच वेळी सहा मतदारसंघातील मतमोजणीला प्रारंभ होईल. साधारणतः साडेदहा ते अकराच्या सुमारास पहिल्या फेरीचा निकाल अपेक्षित आहे. मतमोजणी संदर्भातील प्रक्रिया ही निवडणूक आयोगाच्या निर्देशित सूत्रानुसार व सूचनेनुसार चालते. यासाठी निवडणूक विभागाकडून नेमणूक करण्यात आलेले निवडणूक निरीक्षक आणि जिल्हाधिकारी निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाचे पालन करीत मतमोजणी प्रक्रिया पार पाडतात. ४ जूनच्या सायंकाळपर्यंत सर्व फेऱ्यांची मतमोजणी पार पडण्याची शक्यता आहे.

**प्रत्येकी १४ टेबलवर मतमोजणी**नांदेड जिल्ह्यात सहा विधानसभा क्षेत्र आहेत. एका विधानसभासाठी १४ टेबल असे एकूण ८४ टेबलवर मतमोजणी होणार आहे. याशिवाय पोस्टल बॅलेटसाठी १२ टेबल आहेत. थोडक्यात नांदेड जिल्ह्याची मतमोजणी ९६ टेबलवर होणार आहे.

**कर्मचाऱ्यांची रंगीत तालीम**प्रत्येक टेबलवर चार कर्मचारी असतात. यामध्ये मायक्रो ऑब्झर्वर म्हणजे सूक्ष्म निरीक्षक , दुसरे सुपरवायझर म्हणजे मतमोजणी पर्यवेक्षक, तिसरा काउंटिंग असिटंट म्हणजे मतमोजणी सहाय्यक आणि चौथा असतो एक शिपाई सहाय्य करण्यासाठी. या प्रत्येक पदाचे जवळपास प्रत्येकी १०० कर्मचारी कार्यरत असतात. आज या सर्व कर्मचाऱ्यांनी सकाळच्या सत्रात रंगीत तालीम पूर्ण केली आहे सकाळी सहा वाजता हे कर्मचारी आपल्या कर्तव्यावर पोहोचणार आहेत.

**नांदेडमध्ये २६ फेऱ्याची मतमोजणी** नांदेड जिल्ह्यामध्ये सर्वात कमी २३ तर सर्वात अधिक २६ फेऱ्यानंतर पूर्ण निकाल लागेल.एका फेरीला साधारण अर्धा तास लागतो. मात्र मतमोजणी कर्मचाऱ्यांना पुढे पुढे सराव झाल्यामुळे त्यापेक्षा कमी वेळ लागतो. जितके मतदान केंद्र तितके गुणेला १४ टेबल त्यामुळे उत्तर नागपूरला २३ तर सर्वात अधिक देगलूर नांदेडमध्ये २६ फेऱ्या होतील. साधारणतः आठ वाजता मतमोजणी सुरू झाल्यानंतर पहिल्या फेरीचा अंदाज निकाल दहा -साडेदहा ते ११ पर्यंत येईल, असा अंदाज आहे.

**मोबाईल नेण्यास प्रतिबंध**मतमोजणी केंद्रामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देशित केलेल्या मोजक्या अधिकाऱ्यांशिवाय माध्यम प्रतिनिधी असो किंवा लोकप्रतिनिधी असो कोणालाही केंद्राच्या आतमध्ये मोबाईल घेऊन जाण्यास परवानगी नाही. त्यामुळे मतमोजणी प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या सर्वांनी आपले मोबाईल सोबत आणू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

**लाऊडस्पिकर्सची व्यवस्था**शासकीय तंत्रनिकेतन परिसरात रस्त्यावर ऐकू येईल अशा पद्धतीने लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांना देखील या परिसरात लाऊड स्पीकरवर फेरीनिहाय निकाल ऐकता येणार आहे. जिल्हा प्रशासनाने या परिसरात नागरिकांसाठी ही सुविधा उपलब्ध केली आहे.

**माध्यम केंद्राची उभारणी** नागरिकांना कळावे यासाठी निवडणूक आयोगाने ज्या पत्रकारांना प्रवेशिका दिल्या आहेत अशाच पत्रकारांना या ठिकाणी प्रवेश निश्र्चित करण्यात आला आहे. त्यांच्यामार्फत उद्याच्या मतमोजणीचे वृत्तांकण होणार आहे. महादेव दालमिलकडील गेटमधून हा प्रवेश पत्रकारांना दिला जाणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गाड्यांची पार्किंग करता येणार आहे.

पान १ वरुन

### निवडणूक आयोगाविरोधात...

राजीव कुमार यांनी मौन बाळगले. टपालमतांची मोजणी अर्धातास आधी सुरू होईल, असे आयुक्तांनी सांगितले.

सुरत मतदारसंघामध्ये भाजपेतर सर्व उमेदवारांनी स्वत:हून अर्ज मागे घेतला तर निवडणूक आयोग काय करणार? अर्ज बळजबरीने मागे घ्यायला लावला असेल तर आम्ही हस्तक्षेप केला असता, असे स्पष्टीकरण आयुक्त राजीवकुमार यांनी दिले. सुरतमध्ये रिंगणात एकच उमेदवार असल्याने निवडणूक घेता आली नाही. लोकशाहीमध्ये ही परिस्थिती योग्य नसली तरी कायद्यानुसार आयोगाने निर्णय घेतला असल्याचे राजीव कुमार म्हणाले. मतदारांसाठी 'नोटा' हा पर्याय असल्याने मतदानाची प्रक्रिया झाली पाहिजे, असा मुद्दा विरोधकांकडून उपस्थित करण्यात आला होता.

मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यात दिरंगाई झालेली नाही. मतटक्क्यांचा आकडा सगळ्यांसाठी उपलब्ध होता. अंतिम मतटक्का देण्यासाठी तीन-चार दिवसांचा कालावधी लागतो. त्या मुदतीमध्येच सर्व टप्प्यांतील मतटक्क्यांची आकडेवारी जाहीर करण्यात आल्याचा दावाही आयुक्तांनी केला. पहिल्या दोन टप्प्यांतील मतटक्क्यांचा आकडा मतदानानंतर ११ दिवसांनी जाहीर केला गेला, त्यानंतर विरोधकांनी आयोगावर तीव्र टीका केली होती. या मुद्द्यावर मात्र आयुक्तांनी मौन बाळगले.

यंदा लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया पूर्ण होण्यास दीड महिना लागला. संपूर्ण मे महिन्याच्या असह्य उकाड्यात आणि उष्णतेच्या लाटेत मतदान झाले. त्याचा मतदारांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. त्यातून आयोगाने धडा घेतला असून यापुढे निवडणुका एप्रिलमध्ये महिनाभरात पूर्ण केल्या जातील, असे आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांवर दबाव नाही! मतमोजणीची प्रक्रिया निर्दोष असून त्यामध्ये गैरप्रकार होण्याची कोणतीही शक्यता नाही. मतमोजणीमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी दीडशे जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून दबाव आणला जात असल्याचा आरोप पूर्णपणे चुकीचा आणि दिशाहीन आहे, असे स्पष्टीकरण राजीव कुमार यांनी दिले. काँग्रेसचे माध्यम विभाग प्रमुख जयराम रमेश यांनी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी जिल्हाधिऱ्यांशी संपर्क साधल्याचा दावा 'एक्स'वरून केला होता. यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाने रमेश यांना नोटीस पाठवली असून पुरावे सादर करण्यास सांगितले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगावर अनेक आरोप झाले असून या हल्ल्यांपासून आयोगाला स्वत:चा बचाव करता आला नाही. पण आरोप करणाऱ्यांनी पुरावे द्यावेत, असा पुनरुच्चार राजीव कुमार यांनी केला.

### मनोज जरांगे यांचं उद्याचं ..

उपोषण तात्पुरत स्थगित करत आता उपोषणाची नवी तारीख घोषीत केली आहे. येत्या ८ जून रोजी आपण उपोषणाला बसणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे. दरम्यान, सध्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर आचारसंहिता लागू असल्याने आचारसंहितेचा भंग होऊ नये, किंवा आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले जाऊ शकतात, या पार्श्र्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी सावध भूमिका घेत उद्याचं उपोषण तात्पुरत स्थगित केलं असल्याची माहिती त्यांनी सांगितली आहे.

मनोज जरांगे यांच्या उपोषणाला अंतरवाली सराटीच्या ग्रामस्थांनी विरोध केला आहे. त्यामुळे उद्याचं उपोषण स्थगित करत आता गाव सोडून दुसरीकडे उपोषण करणार आहे, माझ्यासाठी गावकरी अडचणीत येणार नाहीत, यासाठी हा निर्णय़ घेत असल्याची प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे.

### लोकसभेच्या निमित्ताने देशात ..

गेल्या चार दशकातील हे सर्वाधिक मतदान होतं, असंही राजीव कुमार यांनी स्पष्ट केलं.

मतदानाच्या काळात निवडणूक आयोगाच्या आयुक्तांना लापता जेंटलमन म्हणत डिवचलं गेलं होतं. या टीकेवरही त्यांनी आज प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही कधीच बाहेर गेलो नव्हतो.प्रसिद्धी पत्रकांच्या माध्यमातून आम्ही जनतेशी संवाद साधत होतो.

मतदानाच्या काळात आम्ही जवळपास १०० प्रसिद्धी पत्रके काढली, असं राजीव कुमार म्हणाले. मतदान प्रक्रियेच्या काळात तब्बल १० हजार कोटींची रोख रक्कम जप्त केली असून २०१९ च्या तुलनेत ही तीनपट अधिक रक्कम आहे. यासाठी स्थानिक गटांना सक्रीय करण्यात आलं होतं, असं राजीव कुमार म्हणाले. ६८ हजार मॉनिटरिंग टीम होत्या. तर दीड पोलिंग आणि सुरक्षा दल या निवडणूक प्रक्रियेत कार्यरत होते, अशीही माहिती त्यांनी दिली.

# यंदा पावसाचे प्रमाण असणार समाधानकारक

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्रात मान्सून साधारणपणे येत्या ५ ते ७ जूनपर्यंत दाखल होईल असा अंदाज हवामानशास्त्राचे अभ्यासक संशोधक डॉ. राघवेंद्र गायकैवारी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला. 'वेध पर्जन्याचा' या विषयावर त्यांचे भाषण झाले त्यानंतर ते बोलत होते. मराठवाडा, विदर्भ, कोकण, मध्य महाराष्ट्र आदी भागात यंदा पावसाचे प्रमाण समाधानकारक असेल. विशेष म्हणजे राज्यातील धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण चांगले राहील. असे असले तरीही ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात पावसात खंड पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्यावतीने यावर्षी सरासरी १०६ टक्के पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे, असे ते म्हणाले. देशभरातदेखील पावसाचे प्रमाण चांगले राहील. विशेषत: उत्तर भारतात हे प्रमाण तुलनेने अधिक असेल असे ते म्हणाले. हा पाऊस खरीप आणि रब्बी पिकांच्या वाढीसाठी उपयुक्त ठरणार आहे. होळी आणि अक्षय्यतृतीयेच्या सणांचे महत्त्व लक्षात घेऊन खगोलशास्त्राच्या आधाराने देखील हे अंदाज अचूकपणे लावता येऊ शकतात, असे डॉ. गायकैवारी यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# डिप्लोमा इंजीनियरिंग ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर येथील कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी इंजीनियरिंग डिप्लोमा मध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी (एफसी.) क्रमांक ६३२६ ची मान्यता मिळाली असून बुधवार दिनांक २९ मे २०२४ पासून ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणे कागदपत्रे पडताळणी व अर्ज निश्र्चिती आधी प्रक्रिया सुरू झाली असून ही प्रक्रिया मंगळवार दिनांक २५ जून २०२४ पर्यंत चालणार आहे अशी माहिती डिप्लोमा इंजीनियरिंग चे प्राचार्य डॉक्टर अजित कापसे यांनी दिले आहे



सन दोन हजार चोवीस पंचवीस डिप्लोमा इंजीनियरिंग प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे भरलेले अर्ज स्वीकारून प्रमाणपत्रे कागदपत्राची तपासणी छाननी व नोंदणी आधी प्रक्रिया करणे मुंबई येथील महासंचालक तंत्र शिक्षण संचालन महाराष्ट्र राज्य यांचे अधिकृत केंद्र ६३२६ म्हणून कर्मवीर डिप्लोमा महाविद्यालयात मान्यता दिली आहे पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन पालकांचा होणारा संभ्रम संबंधित कागदपत्रे जमवताना त्यांना होणारी अडचण व शंका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा केंद्र सुरू केले असून यंदाची डिप्लोमा इंजिनिअरिंगचे सोळावे वर्ष आहे कर्मयोगीच्या डिप्लोमा महाविद्यालयामध्ये उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे हे प्रक्रिया २९ मे २०२४ पासून २५ जून २०२४ सायंकाळी पाच वाजेपर्यंत चालणार आहे याचा लाभ दहावी मधून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी घेण्याचे आवाहन केले आहे

या कालावधीतील प्रमाणपत्राची पडताळणी छाननी व नोंदणी आधी प्रक्रियेनंतर मुख्य कॅम्प राऊंड ऑफ साठी क्शन फॉर्म भरण्याची ऑनलाइन प्रक्रिया चालू होणार आहे डिप्लोमा इंजीनियरिंग प्रवेशा संबंधी अधिक माहितीसाठी प्राध्यापक पंढरपूरकर एस एस ९१४६५९७८२० व प्राध्यापक कोरबू पाहिजे ८८८८८४८९२३५ यांच्याशी संपर्क साधण्याचे आव्हान प्राचार्य डॉक्टर अजित कणसे सर यांनी केले आहे पांडुरंग प्रतिष्ठानचे मार्गदर्शक मा आमदार प्रशांत परिचारक रोहन परिचारक कर्मवीर इंजिनिअरिंग चे प्राचार्य डॉक्टर रजिस्टर माझी डी वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली डिप्लोमा इंजीनियरिंग सेंटर मध्ये सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून येत आहे

# तथागत ग्रुपच्या वतिने दहावी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व भिमरत्न पुरस्काराचे आयोजन: संदिपभाऊ गवई

**बुलढाणा/ राहुल साबळे**

मेहकर शहरातील तथागत बहुउद्देशीय संस्था व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व भिमरत्न पुरस्काराचे आयोजन करण्यात आले विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित करण्यात येणार असल्याची माहिती ही तथागत बहुउद्देशीय संस्था व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी दिली आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या अनेक वर्षापासून मेहकर शहरातील तथागत बहुउद्देशीय संस्था व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने मेहकर शहरातील दहावी व बारावी उत्तीर्ण




विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाब्बासकीची कुणी तरी थाप मारावी जेने करून त्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून दहावी बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांनचा गुणगौरव तसेच मान्यवरांच्यावतीने मार्गदर्शन करण्यात येणार असून याही वर्षी दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या सत्काराचे सामाजिक, राजकीय, डॉक्टर प्राध्यापक, इंजिनीयर, वकील व पोलीस प्रशासन या विभागातील अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरील कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती ही प्रसिद्धी पत्रकाद्वारे तथागत बहुउद्देशीय संस्था व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी केले असून या सत्कार समारंभास व पुरस्कार वितरण सोहळ्यास व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी व दहावी उत्तीर्ण होणार्या विद्यार्थ्यांनी आपल्या मार्क मेमोची झेरॉक्स व एक पासपोर्ट फोटो व्हाट्सअप मो. क्र. ९९७०४६७१४१ या तथागत ग्रुप संपर्क कार्यालय नंबरवर दि.०८/०६/२०२४ रोजी पर्यत पाठवावे असे आव्हान करण्यात आले आहे.

# निफाड पोलीस ठाणे तर्फे नागरीकांना जाहीर आवाहन

**निफाड/प्रतिनिधी**

निफाड पोलीस ठाणे जिल्हा नाशिक ग्रामीण हद्दीतील सुजाण नागरिकांना याद्वारे निफाड पोलीस ठाण्याचे वतीने जाहीर आवाहन करण्यात आले असून, नाशिक लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक १०/३/२०२४ पासून ते दिनांक ६/६/२०२४ पावेतो आदर्श आचारसंहिता अमलात असून नाशिकसह संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल मंगळवारी दिनांक ४/६/२०२४ रोजी जाहीर होणार असून त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक,



इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमांद्वारे करू नयेत. तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये. डीजे वाजवणार नाहीत. फटाके फोडणार नाहीत. तसेच विनापरवाना विजयी मिरवणूक काढू नये व्हाट्सअप ग्रुपचे डमिन यांनी दिनांक ३/६/२०२४ ते दिनांक ६/६/२०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंगमध्ये जपश्रू रवाळप करून बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुपमधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुपवर टाकणार नाहीत.* जर एडमिन यांनी सेटिंग मध्ये बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह सर्व ग्रुप डमिनला जबाबदार धरून त्यांचेविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नंदकुमार कदम यांनी दिला आहे.सर्वानी याची कृपया नोंद घ्यावी.

# सोलापूरच्या तेजस गाडी याने बी.टेक मध्ये मिळविला पुण्यातील कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूरचा रहिवासी असलेल्या तेजस वेणुगोपाळ गाडी या विद्यार्थ्याने पुण्यातील नामवंत अशा विश्र्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीआयटी) या कॉलेजमध्ये बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजीच्या (बी. टेक.) परीक्षेत आयटी विभागात प्रथम क्रमांक मिळवला. त्याला या परीक्षेत सीजीपीए मध्ये ९.५६ इतके गुण मिळाले. कॉलेजकडून त्याला सिल्व्हर मेडल देऊन




गौरवण्यात आले. त्याचे शालेय शिक्षण सोलापुरातील व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण वालचंद शास्त्र महाविद्यालयात झाले. पत्रकार वेणुगोपाळ गाडी यांचा तो पुत्र असून या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# लालपरीचा वर्धापनदिन केक कापून वाटले पेढ मोठ्या उत्साहात साजरा

सोलापूर/प्रतिनिधीः १ जून १९४८ रोजी सुरू झालेल्या लालपरीचा ७६ वा वाढदिवस सोलापूर आगारासह जिल्ह्यातील नऊ डेपोंमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सोलापूर एसटी आगाराला छान सजविण्यात आले होते. महामंडळाच्यावतीने केक कापून आणि प्रवाशांना पेढे वाटून हा वाढदिवस एस.टी. महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहात साजरा केला. मध्यवर्ती बस स्थानक येथे लालपरीची पुष्पहार अर्पण पूजा करण्यात आली. स्थानकावर असलेल्या सर्व प्रवासी बंधूंना साखर व पेढे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विभाग नियंत्रक विनोदकुमार भालेराव, यंत्र अभियंता विभागाचे विवेक लोंढे उपस्थित होते. मध्यवर्ती बसस्थानक येथे सजावट व सुशोभिकरण करण्यात आले होते. ठिकठिकाणी नारळाचे फाटे, केळीचे खुंटे, आंब्याचे तोरण, फुलांच्या माळा तसेच जागोजागी शोभिवंत रांगोळी काढण्यात आली होती. अत्यंत अविस्मरणीय अशाप्रकारे वर्धापनदिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.



सोलापूर आगाराचे आगार व्यवस्थापक वरिष्ठ उत्तम जुंदळे, आगार व्यवस्थापक कनिष्ठ जाधव, सहायक वाहतूक अधीक्षक उमा गव्हाणे, सहायक कार्यशाळा अधीक्षक आनंद रोमन, प्रभाकर नाटेकरी यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# नांदेडची सायंटिस्ट भीमकन्या मनाली दामोधर हिच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक

## ■ स्त्री गर्भाशयाच्या पीसीओएस आजाराच्या निदानासाठी शोधली पहिली कीट ■

**नांदेड/दैनिक यश सिध्दी न्युज**



**बी.ए.बीएड अभ्यासक्रम पूर्ण करूनही केवळ मुलांचे शिक्षण आणि उज्वल करिअर यावर कुठलाही परिणाम होवू नये,यासाठी शिक्षिकेच्या नोकरीची ऑफर येवूनही जॉब न करण्याचा निर्णय घेणारी आई आशाताई दामोदर, शिक्षक वडील गौतम दामोदर, संस्था चालक इंजि.प्रशात ठमके ,बहीण डॉ. सांची दामोदर आणि काका शिवाजी दामोदर ,मामा साहेबराव पवार यांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले, त्यामुळे माझ्या या उल्लेखनीय यशाचे खरे श्रेय मी त्यांनाच देते, असे नमूद करून कु. मनाली दामोदर हिने महिलांच्या गर्भाशयाच्या गंभीर आणि पुढ कॅन्सरमध्ये परावर्तित होणाऱ्या आजाराचे वेळीच निदान होणार असल्याने रोगांवर प्राथमिक अवस्थेत उपचार करणे शक्य होणार आहे. फ्रान्समधील युनिव्हर्सिटी ऑफ बोर्डिअक्स या लॅबने तिच्या संशोधनाची दखल घेवून लिव्हर कॅन्सर वरील संशोधनासाठी निमंत्रित केले आहे.त्यामुळे तेथील रिसर्च कोर्स करण्यासाठी येत्या मंगळवार दि.४ जुन रोजी मी फ्रान्सला जाणार आहे. मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमान तळावरून फ्रान्ससाठी प्रयाण करणार आहे, तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्या मुळेच मला हे यश मिळविणे शक्य झाले, असेही मनालीने यावेळी मोठ्या आत्मविश्र्वासाने सांगितले.**

येथील एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या कु. मनाली गौतम दामोधर हिने आपल्या बुध्दी कौशल्याच्या जोरावर संशोधन क्षेत्रात अदभुत आणि असामान्य कामगिरी केली आहे. इयत्ता बारावी नंतर आंध्र प्रदेशातील तिरुपती येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर येथे बॅचलर ऑफ सायन्स ,मास्टर ऑफ सायन्स हा पाच वर्षाचा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करताना मनाली दामोधर हिने महिलांच्या गर्भाशयाच्या पीसीओएस या गंभीर आजाराचे अगदी सहज सोप्या पद्धतीने निदान करण्यासाठी स्वतःच्या कल्पकतेने यशस्वी केलेल्या प्रयोगाने चक्क जागतिक स्तरावर नावलौकिक मिळविला असून त्याबद्दल त्यांच्या टीमने सुवर्णपदक पटकावले आहे. त्यामुळे नांदेडच्या या सायंटिस्ट भीम कन्येने संशोधन क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठा भीम पराक्रम केला आहे, त्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

सध्या तरोडा सांची नगर येथील रहिवाशी मनाली गौतम दामोधर ही हदगाव तालुक्यातील चिंचगव्हाण या गावाची मूळ रहिवासी असून वडीलांच्या नौकरी निमित्ताने कुटूंब किनवट येथे अनेक वर्षे वास्तव्यास असल्याने मनालीने इयत्ता दहावी आणि बारावी बोर्डाची परीक्षा किनवट येथील महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूल येथून विशेष प्राविण्यासह उतीर्ण केली. इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा ही चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांना साधारणतः डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्याची इच्छा असते. नव्हे तर वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्र जणू त्यांना खुणावत असते.परंतु आजघडीला मोठे वलय असलेल्या या दोन्ही हायटेक करिअरचा मोह न करता मनालीने आपली मोठी बहीण डॉ.सांची दामोधर यांच्या मार्गदर्शनाखाली आंध्र प्रदेशातील तिरुपती येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर येथे बॅचलर ऑफ सायन्स ,मास्टर ऑफ सायन्स या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. तसेच केवळ जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम करण्याची तयारीच्या जोरावर मनालीने गेल्या पाच वर्षांत पदवी आणि पदव्युत्तरची परीक्षा उतीर्ण केली. या अभ्यासक्रमाचा एक भाग असलेल्या प्रोजेक्टमध्ये महिला वर्गांमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेल्या पीसीओएस या स्त्री रोगावर सोप्या पद्धतीने निदान करण्यासाठी स्वतःच्या कल्पकतेने तिने आपल्या टीमला संशोधन करण्याची डिटेक्शन किटची आयडिया दिली. खरेतर महिलांच्या गर्भाशयातील पीसीओएस गंभिर आजाराचे निदान आजघडीला सोनोग्राफी आणि काही हार्मोन्स टेस्टिंगच्या मदतीने हा आजार कन्फर्म करता येतो. परंतु त्यामध्ये शंभर टक्के रिझल्ट मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

अशा प्रकारे महिलांच्या गंभिर मोठ्या जीवघेण्या आणि तेवढ्याच चिंताजनक समजल्या जाणाऱ्या या आजाराचे सहज आणि सोप्या पद्धतीने निदान करण्यासाठी मनाली दामोधर हिने आपल्या टीमला डिटेक्शन किटची आयडिया दिली. तसेच टीममधील सर्वांना ती आवडल्यामुळे लगेच त्यांनी त्यावर सातत्याने अभ्यासपूर्ण संशोधन करून हा प्रयोग यशस्वी केला. रुग्ण महिलेच्या रक्ताचे सॅंपल घेवून त्यावर टेस्टिंग प्रकिया करून या स्त्री रोगाचे निदान करणारे जगभरातील यावरील हे पहीले संशोधन ठरले आहे. विशेष म्हणजे टीममधील सर्वांच्या अथक परिश्रमामुळे हा प्रयोग यशस्वी ठरला असून जागतिक स्तरावरील स्पर्धेत तो बक्षीस पात्र ठरला आहे. फ्रान्स देशातील पॅरिस या शहरात गतवर्षी घेण्यात आलेल्या नवोदित संशोधकांसाठीच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत तिरुपती येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर ( खखडएठ) यांच्या टीमने उल्लेखनीय कामगिरी केली असून त्याठिकाणी त्यांनी सादर केलेल्या डिटेक्शन किट या संशोधनास सुवर्ण पदक मिळाले आहे. या टीममध्ये नांदेडच्या मनाली दामोधर या तरुण सायंटिस्ट भीम कन्येचा समावेश असून तिच्या या अदभुत यश आणि चमकदार कामगिरी बद्दल समाजाच्या सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

# सोलापूर विद्यापीठ; कंत्राटी भरतीप्रकरणी चौकशी समिती नियुक्ती

सोलापूर/प्रतिनिधीः पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षात झालेल्या सहायक प्राध्यापक (कंत्राटी) पदाच्या भरतीप्रक्रियेत अनियमितता झाली असून याप्रकरणी चौकशी करण्यासाठी कुलगुरूंच्या आदेशानुसार कुलसचिव योगिनी घारे यांनी पाचजणांची समिती नियुक्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय फुलारी हे चौकशी समितीचे अध्यक्ष असून या समितीत सदस्य म्हणून मुंबई विद्यापीठातील पदार्थ विज्ञान विभागाच्या प्रमुख डॉ. वैशाली बंबोले, केगाव (सोलापूर) येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. नवले, दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार उबाळे, बार्शी येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्रा.डॉ. व्ही.पी. शिखरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सोलापूर विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने भरलेल्या सहायक प्राध्यापकांच्या भरतीप्रक्रियेत अनियमितता झाली असल्याची तक्रार सिनेट सदस्य तथा युवक काँग्रेसचे शहर अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी ७ मार्च रोजी कुलगुरूंकडे केली होती. या तक्रारीची दखल घेऊन पावणे तीन महिन्यांनी याप्रकरणी पाचजणांची चौकशी समिती नियुक्त केली आहे. यासाठी डोंगरे यांनी निवेदन दिल्यानंतरही वारंवार पाठपुरावा केला होता. त्यांच्या



या पाठपुराव्याला उशिरा का होईना, पण यश आले आहे.

# आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा.लि.चे रोलर पूजन संपन्न



**मंगळवेढा/प्रतिनिधी**

आवताडे उद्योग समूह संचलित आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा.लि.नंदूर या साखर कारखान्याचा या गळीत हंगाम २०२४-२५ हंगामातील रोलर पूजन श्री.संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ मार्गदर्शक विष्णुपंत बाबुराव आवताडे यांच्या हस्ते व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दोन वर्षांपासून या साखर कारखान्याने

**यावेळी रोलर पूजन उदघाटक विष्णुपंत आवताडे यांचा आवताडे शुगरचे सर्व अधिकारी, पदाधिकारी, खाते प्रमुख व कर्मचारी यांच्या वतीने वाढदिवसानिमित्त त्यांचा यथोचित सन्मान करून त्यांना पुढील जीवन वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून दोन गळीत हंगाम यशस्वीपणे पूर्ण केले आहेत. अगदी त्याच पद्धतीने या चालू वर्षातील गळीत हंगाम सर्वांनी मिळून यशस्वीपणे पार पाडा असा कार्यमंत्र श्री. संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, भारत निकम, टेक्निकल सरव्यवस्थापक सुहास शिनगारे चिफ केमिस्ट मोहन पवार, एच आर मॅनेंजर ज्ञानेश्र्वर बळवंतराव, डिस्टिलरी मॅनेजर संभाजी फाळके, चिफ अकौंटंट बजरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, उपशेती अधिकारी तोहीद शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रेवे, डे.चिफ इंजिनिअर प्रताप मोरे, डे.चिफ केमिस्ट सोमनाथ ढावरे, स्टोअर किपर महेश इंगळे, पर्चेस मॅनेजर अजित सरवळे, सुरक्षा अधिकारी चंद्रकांत राठोड, सहा.सुरक्षा अधिकारी रणजीत पवार अधिकार व कर्मचारी उपस्थित होते.




# श्री संत कबीर महाराज मठ व फडाकडून श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरास लाकडी मेघडंबरी अर्पण

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचे काम पुरातत्व विभागामार्फत सुरू आहे. त्यामध्ये श्री.विठ्ठल गाभारा व श्री.रूक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम प्राधान्याने पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये श्री विठ्ठल गाभारा व श्री रूक्मिणी गाभारा येथील मेघडंबरी देखील नव्याने तयार करून बसविण्यात येत आहे. त्यासाठी श्रीसंत कबीर महाराज मठ व फडातर्फे सेवाभावी तत्वावर दोन मेघडंबरी मंदिर समितीस उपलब्ध करून दिल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. सदरच्या दोन्ही मेघडंबरी आज समितीस प्राप्त झाल्या असून, मेघडंबरीचे पुजन मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते श्री विठ्ठल सभामंडप येथे करण्यात आले आहे. तसेच कबीर महाराज मठाचे ह.भ.प.विष्णू महाराज कबीर, तेजस फर्निचरचे मिलिंद करंडे व पांडूरंग लोंढे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, विभाग प्रमुख संजय कोकीळ, ज्ञानेश्र्वर कुलकर्णी, बलभीम पावले, राजेंद्र सुभेदार, अतुल बक्षी, अमित नवाळे व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

सदरच्या दोन्ही मेघडंबरी तेजस फर्निचर पंढरपूर येथील अमोल सुतार, बाळू सुतार, पांडूरंग लोंढे या कारागीराने तयार केल्या असून, त्यासाठी देवरूख जि. रत्नागिरी येथील ३ ते ४ वर्षापूर्वीच्या सागवाणी लाकडाचा वापर केला आहे. मेघडंबरीचे अनुक्रमे १६० व ११० किलो वजन आहे, सुमारे ३ लाख ५० हजार इतके बाजारमुल्य आहे व तयार करण्यासाठी ३५ ते ४० दिवसाचा कालावधी लागला आहे. सदरचे काम मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख जळगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले आहे. सदरच्या दोन्ही मेघडंबरीला चांदी लावून आषाढी यात्रेपूर्वी गाभा-यात बसविण्याचे नियोजन करण्यात आल्याचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी यावेळी सांगीतले.



# वडनेर भैरव काल भैरवनाथ देवस्थान विश्वस्तपदी लक्ष्मण सलादे यांची निवड

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी जिर्णोद्धार केलेल्या कालभैरवनाथ देवस्थान या अत्यंत प्रतिष्ठेच्या ट्रस्ट मध्ये लक्ष्मण माधवराव सलादे यांची बिनविरोध निवड करण्यात आली देवस्थान विश्र्वस्त निवड समितीचे सदस्य माजी आमदार उत्तम बाबा भालेराव माजी जिल्हा परिषद सदस्य संपतराव वक्ते देवस्थान ट्रस्टचे कायदेशीर सल्लागार पोपटराव पवार यांनी केली असून सलादे परिवाराच्या वतीने विश्र्वस्त म्हणून निवड झालेल्या लक्ष्मण सलादे यांचा परिवाराच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.यावेळी एकनाथ सलादे, रामचंद्र सलादे व पत्रकार सुरेश सलादे यांच्या हस्ते पुष्पहार शाल टॉवेल टोपी व श्रीफळ देऊन लक्ष्मण सलादे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी,ग्रामपंचायत सदस्य सुनिता सलादे ,सप्तशृंगी पतसंस्थेचे संचालक पंडित सलादे. कारभारी सलादे साहेबराव सलादे ,अशोक सलादे, डॉ,कैलास सलादे ,शिवा सलादे,गणपत सलादे,संदिप सलादे,अनिल सलादे, साहेबराव सलादे, गणेश सलादे, नवनाथ सलादे,यांच्यासह सलादे परिवारातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी लक्ष्मण सलादे सत्काराला उत्तर देताना म्हणाले . सलादे परिवारातील ज्येष्ठ मार्गदर्शक यांच्या मार्गदर्शनाखाली नक्कीच मी चांगले काम करीन सलादे परिवाराच्या वतीने निवड समितीचे सदस्य लवाद माजी आमदार उत्तम बाबा भालेराव संपतराव वक्ते व पोपटराव पवार यांचे. आभार मानण्यात आले

# गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी दर्जेदार शिक्षणाची गरज : भास्कर वाघमारे

## डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम च्या वतीने गुणवंताचा गुणगौरव सोहळा संपन्न

**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे**

भारताच्या इतिहासातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये तत्त्वज्ञानी विज्ञानाच्या माध्यामातून शैक्षणिक क्षेत्रामध्ये खुप मोठे बदल घडून आले विद्यार्थ्यांमध्ये आणि त्यांच्या विचारांमध्ये व मानव जातीच्या उद्धारासाठी शिक्षणाची किती गरज आहे हे बदल घडविणे आजच्या काळाची गरज आहे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावा म्हणून शिक्षणाची संस्कृती जपली पाहिजे शिक्षण आणि शिक्षणाची गुणवत्ता व वैचारिकता हे सर्व साधारणपणे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी आणि कल्याणासाठी डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल चा उगम झाला आणि विद्यार्थी ही घडत गेला अशीच परिस्थिती आज ही आहे केंद्रात पहिला आणि दुसरा विद्यार्थी हा डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियमचा आहे त्यामुळे सार्थ अभिमान आहे त्यामुळे विद्यार्थीच्या गुणवत्ता प्राप्तीसाठी दर्जेदार शिक्षणाची गरज भासते आणि ते डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडियम स्कुल मध्ये आहे असे प्रतिपादन भास्कर वाघमारे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना केले नळदुर्ग येथे डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळेस ते बोलत होते

प्रथमता रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष अरुण लोखंडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय चिनगुंडे खय्युम मनियार तुकाराम कुंभार हे होते

प्रथमता डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्य प्रवर्तक संस्थापक मारुती खारवे यांचा दर्जेदार शिक्षण आणि विद्यार्थ्यांवर शिक्षका वरती करडी नजर ठेवून शिक्षणाची बाजू मजबूत करणारे पहिले संस्थापक म्हणून त्यांचा पालकांच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला यावेळी अनेक शिक्षकाने आपले मनोगत व्यक्त केले.



जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग येथे प्रशालेत ८८ %टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवल्याने प्रबोधिनी दादासाहेब बनसोडे हिचा डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम च्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला यावेळी सर्व गुणवत्ता प्राथमिक विद्यार्थ्यांचा शाल बुके देऊन सत्कार करण्यात आला यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कविता पाटील सर्व गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार केला कार्यक्रमाचे आयोजन डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम च्या वतीने करण्यात आले होते यावेळी सर्व शिक्षक पालक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

# बहुआयामी नेतृत्व म्हणजे शिवाजीराव खांडेकर : कदम

**मोडनिंब/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर हे राज्यातील तमाम शिक्षकेतर बांधवांचे लाडके नेते आहेत शिवाय सामाजिक प्रश्र्नांची जाण असणारे बहुआयामी नेतृत्वही आहेत. राज्यातील संस्था, शाळा, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्र्नांना न्याय मिळवून देत असतात, आता समजकार्यासाठी त्यांच्या सारख्या नेतृत्वाची गरज आहे शिक्षण क्षेत्रातील विकासासाठी त्यांना विधान परिषदेत पाठविण्याच्या तयारीत रहा. असे मत पुणे महानगरपालिका माजी स्थायी समिती अध्यक्षा, विद्यमान नगरसेवक अश्र्विनीताई कदम यांनी व्यक्त केले.

राष्ट्र सेवा दलाच्या निळू फुले सभागृहात शिवाजीराव खांडेकर यांच्या ५१ व्या वाढदिवस अभिष्टचिंतन आणि राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी अध्यक्षीय भाषणातून त्या बोलत होत्या. यावेळी राज्यातील विविध जिल्हयातील आदर्श शाळा, शिक्षक, मुख्याध्यापक, लिपिक आणि सेवकांना शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ठ कार्याबद्दल शिवसमर्थ प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोपान (काका) चव्हाण विद्यमान नगरसेवक पुणे म.न.पा., सचिन दोडके विद्यमान नगरसेवक पुणे म.न.पा., माजी उपशिक्षणाधिकारी के. एन. चौधरी आदि उपस्थित होते. यावेळी आदर्श शाळा म्हणून - श्री गुरुबसव हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, संख ता.जत, जि.सांगली, विकास शिक्षण संस्थेचे राजे शिवछत्रपती विद्यालय चिंचवड पुणे, बळवंतराव यादव हायस्कूल व ज्यू. कॉलेज पेठवडगाव तालुका हातकणंगले जिल्हा कोल्हापूर, हिलरेंज एज्युकेशन सोसायटीचे हिलरेंज माध्यमिक विद्यालय भिलार, तालुका महाबळेश्र्वर जिल्हा सातारा, शिक्षण प्रसारक मंडळ अकलुज संचलित, जिजामाता कन्या प्रशाला व कनिष्ठ



महाविद्यालय अकलुज ता. माळशिरस, जि. सोलापूर.

मुख्याध्यापक पुरस्कार - एकनाथ हरिभाऊ बुरसे, संदीप राजाराम सावगावे, रोहिदास अजिनाथ एकाड, एन. डी.पाटील, कार्तिक सुभाष चव्हाण. शिक्षक पुरस्कार - अच्युत हणमंत माने, हेमलता श्रीधर मेठे - पाटील, चारुता प्रभूदेसाई, पुंडलिक शिवराम भोये, योगेश बाबासो शिंदे. शिक्षकेतर पुरस्कार - विक्रमसिंह तानाजीराव देसाई, रमेश रामचंद्र इंगवले, शिवाजी बापूसो लोंढे, शानाजी विष्णू माने, दत्तात्रय कुंडलिक काळे, बापूराव किसनराव काकडे, नंदकुमार महादेव गिड्डे, संभाजी रंगराव भोसले, अमरनाथ नंदकूमार ढोले, पिंटू किसन भोज आदींना शिवसमर्थ प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानचिन्ह शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांमधून मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि शिवसमर्थ प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिंदूंचे संघटन हाच देशातील सर्व समस्यांवर उपाय : जाधव

सोलापूर/प्रतिनिधीः हिंदूंचे संघटन हाच देशातील सर्व समस्यांवर उपाय आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांनी केले. शनिवारी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र संघ शिक्षा वर्गाचा समारोप ह. दे. प्रशालेच्या मैदानावर झाला. यात सोलापूरसह नाशिक, पुणे, नगर, सातारा, सांगली, कोल्हापूर या सात जिल्ह्यांतील स्वयंसेवक सहभागी झाले होते. या वर्गाच्या समारोपप्रसंगी प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वामसी लॅब लिमिटेडचे सी.एम. केशव रेड्डी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर वर्गाचे सर्वाधिकारी रवींद्र वंजारवाडकर, वर्ग कार्यवाह राहुल पुंडे, वर्ग पालक दीपक काळे, सोलापूर शहराचे शहर संघचालक राजेंद्रसा काटवे उपस्थित होते.

प्रारंभी ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर संघ प्रार्थना झाली. तसेच संघाच्या संचलनातील 'प्रत्युत् प्रचलनम्' चे प्रात्यक्षिक करण्यात आले. यानंतर 'प्रदक्षिणा संचलनम्' करत रा. स्व. संघाच्या गुरुस्थानी असलेल्या परमपवित्र भगव्या ध्वजास संचलनाद्वारे प्रदक्षिणा घालण्यात आली. यानंतर १५ दिवसीय संघ शिक्षा वर्गात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांना देण्यात आलेल्या घोषवादन, पदविन्यास, दंड युध्द, नियुध्द, योगासन, सामूहिक पद्यगायन या दिलेल्या प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांनी सादर केलेल्या या प्रात्यक्षिकांना उपस्थितांनी दाद दिली. यानंतर तप निरंतर चल रहा है, संघ बढता जा रहा है हे वैयक्तिक गीत सादर करण्यात आले. यावेळी जाधव म्हणाले, देशाचे प्रश्न किंवा समस्या सांगण्यापेक्षा समस्या सोडवणारा समाज व्हावा अशी संघाची भूमिका आहे. संघाच्या वर्गातून सहजीवन, सहकाराचा संस्कार होतो. संघवर्ग म्हणजे पक्के देशभक्त तयार करण्याची भट्टी आहे. ज्यात तयार झालेले स्वयंसेवक न सांगता देशकर्तव्य पार पाडतात. देशासमोर सध्या वैचारिक, आर्थिक व सामाजिक आव्हाने असल्याचा देखील उल्लेख जाधव यांनी यावेळी केला.यावेळी एम. केशवा रेड्डी म्हणाले, रा. स्व. संघ ही देशासाठी निस्वार्थपणे काम करणारी संघटना आहे. गेली ९८ वर्षे संघावर टीका झाली, परंतु संघ निरंतर कार्यरत राहिला. आता संघ आणखी वाढत आहे. मजबूत पायाच्या आधारावर संघ देशभक्तांची तयार करत आहे. संघ प्रशिक्षण शिबिराचे कार्यवाह राहुल पुंडे यांनी प्रास्ताविक करताना सहभागी स्वयंसेवक व शिबिराची माहिती विस्तृतपणे दिली.